## नियमीत दिवाणी दावा क्र.९५/२०२० अर्ज निशाणी १७ खालील आदेश

(CNR-MHNS160010652020)

०१. सदर अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी, लेखी कैफीयत दाखल करण्यासाठी झालेला उशीर माफ होऊन, त्यांची कैफीयत दाखल करून घेण्यासाठी विनंती केली आहे.

०२. वादींनी अर्जास तीव्र आक्षेप घेतला. उभयपक्षांच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद श्रवण केला.

०३. दाव्यातील सर्व कागदपत्र बारकाईने पाहणी केली. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना दावा समन्सची बजावणी झाल्यानंतर ते दाव्यात हजर झाले. परंतु, त्यांना पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी त्यांची कैफीयत, जबाब विहित मुदतीत दाखल केलेली नाही. त्यांच्यात त्यांचा हलगर्जीपणा आहे. परंतु, दाव्याचे स्वरूप पाहता सदर प्रतिवादींना संधी देणे न्यायसंगत वाटते. जर तसे केले नाही तर त्यांच्या बचावाचे दरवाजे बंद होतील व सदरील दावा हा गुणावगुणावर निकाली लागणार नाही व त्यांच्या कायदेशीर अधिकारावर गदा येईल, तरी न्यायाच्या दृष्टीने व मागील कोवीड–१९ च्या अनुशंगाने असलेल्या ताळेबंद लक्षात घेता सदर प्रतिवादींना बचावाची संधी देणे विधीसंगत वाटते. सदर प्रकरणातील वस्तुस्थिती व दाव्याचे स्वरूप पाहता, अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतात. करिता खालील आदेश.

:: **आदेश** ::

१. निशाणी क्र.१७ अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी खर्च म्हणुन रु.३००/–(रूपये तिनशे फक्त) वादीस द्यावे.

३. आदेशाची पुर्तता पुढील तारखेपर्यत न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

Sunil Babasaheb Walke

Digitally signed by Sunil Babasaheb Walke
Date: 2021.03.26 15:50:47 +0530

दिनांक – २६.०३.२०२१.

(सुनिल बा. वाळके)
सह दिवाणी न्यायाधिश, क स्तर,
चांदवड.

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे –

लघुलेखकाचे नांव – एस. टी. पेंढारकर

न्यायालयाचे नांव – प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, चांदवड, ता. चांदवड,
जि.नाशिक.

स्वा/–

दिनांक –२६.०३.२०२१.

लघुलेखक
चांदवड